# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महापालिका ठराव क्रमांक ८१, दिनांक २९-०६-१९९४ नुसार

**{सामान्य प्रशासन विभाग}** एल.एस.जी.डी. परिक्षा देण्याकरिता ज्या कर्मचा-यांनी कार्यालयाची पुर्व परवानगी घेतली आणि भविष्यांत परवानगी घेतली आणि जे हि परिक्षा उत्तीर्ण होतील अशा सर्व महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनाच दोन अग्रिम वेतनवृध्दी मंजूर करण्यांत आलेली आहे.

तसेच या अनुषंगाने या कार्यालयाद्वारा शासनास मागितलेल्या मार्गदर्शनाचे अनुषंगाने उप सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक १२२२/प्र.क्र. १८१/नवि-२६ दिनांक ०१-११-२०२३ मध्ये नमुद नुसार महानगरपालिका सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांना नगरविकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व गृहनिर्माण विभाग, शासन परिपत्रक दिनांक १८-०२-१९७५ व नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १५-०५-२००८ अन्वये दिली जात असलेली आगाऊ/जादा वेतनवाढ ही महानगरपालिका अधिनियम/नियम इ. चा अभ्यास करुन चांगल्या प्रकारे महानगरपालिका सेवेची जबाबदारी पार पाडता यावी यासाठी देण्याची तरतुद आहे. प्रस्तुत परिपत्रक व शासन निर्णयान्वये देण्यांत येणारी वेतनवाढ ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २४-०६-२०१७ नुसार अतिउत्कृष्ठ काम केल्यास अनुज्ञेय असलेल्या वेतनवाढी पैकी नाहीत. सदर वेतनवाढी हया एल.एस.जी.डी. किंवा एल.जी.एस. परिक्षा उत्तीर्ण झाल्याने देण्यांत आल्याने सदर वेतनवाढीचा सहाव्या वेतन आयोगात वेतन निश्चिती करतांना लाभ देणे योग्य ठरते, त्या अनुषंगाने आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांनी त्यांच्या स्तरावर योग्य निर्णय घ्यावा असे अभिमत प्राप्त आहे.

तसेच या संबंधाने मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपिठ नागपूर येथे दाखल याचिका क्रमांक ३५७८/२०२३ चे अनुषंगाने दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजीचे आदेशान्वये शासनाने जारी केलेल्या दिनांक ०१.११.२०२३ पत्राच्या संदर्भा अन्वये, याचिकाकर्त्याच्या एल.एस.जी.डी. पास केल्याने दोन आगाऊ वेतन वृध्दी वाढीच्या दाव्या बाबत (Entitlement) आदेश दिनांका पासून १० दिवसाचे आत महानगरपालिका नागपूर यांनी निर्णय घ्यावा असे निर्देशित आहे.

शासन निर्णय, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, निर्णय क्रमांक क्र. पीएमसी ३००६/२५२७/प्र.क्र. २६/०७/नवि २२ दिनांक १५ मे २००८ मधील तरतुदी नुसार एल.एस.जी.डी. किंवा एल.जी.एस. पदवीकांचा अभ्यासक्रम उत्तीर्ण केल्याच्या दिनांकापासून "स्थानिक स्वराज्य संस्थेतील कर्मचाऱ्यांना एक वेतनवाढ द्यावी" असे नमुद असल्याने खालील प्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

१) एल.एस.जी.डी./एल.जी.एस. परिक्षा पुर्व परवानगी घेवून उत्तीर्ण असणाऱ्या/होणाऱ्या (यापुर्वी परिक्षा उत्तीर्ण झालेले असतील तथापी लाभ अनुज्ञेयता बाबत सक्षम प्राधिकारी मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त नसल्याने अमंल झाला नसेल अश्या प्रकरणांसह) नागपूर महानगरपालिकेत कार्यरत मनपा कर्मचारी यांना उक्त अभ्यासक्रम उत्तीर्ण केल्यामुळे ही परिक्षा उत्तीर्ण केल्याच्या दिनांकापासून नमूद सुधारीत धोरणाप्रमाणे फक्त एक आगाऊ वेतनवाढ संबंधीत अटी/ शर्तीच्या अधिन राहून देय राहील.

२) यापूर्वी एल.एस.जी.डी./एल.जी.एस. परिक्षा उत्तीर्ण केलेल्या मनपा कर्मचाऱ्यांना मनपा ठरावाचे अनुषंगाने (ठराव क्रमांक ८१, दिनांक २९-०६-१९९४) सक्षम प्राधिकारी मा. आयुक्त यांचे मान्यतेने दोन वेतनवाढी देऊन वेतन निश्चिती केलेल्या वेतनाच्या आधारे झालेल्या प्रदानातुन कोणतीही वसुली करण्यात येऊ नये.

३)	महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीएमसी ३००६/२५२७/प्र.क्र. २६/ ०७/नवि २२ दिनांक १५ मे २००८ मध्ये नमुद प्रमाणे, "स्थानिक स्वराज्य संस्थेतील दरवर्षी केवळ १ टक्के कर्मचा-यांना या प्रमाणे एक वेतनवाढ देय राहिल. अधिक कर्मचारी परिक्षेत बसून उत्तीर्ण झाल्याने हि वेतनवाढ सर्वात अधिक गुण मिळणा-या १ टक्के कर्मचा-यांना देय राहिल.

वरिल प्रमाणे प्रस्तावास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-	सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 43/मनपा/प्रशासक** 		**दिनांक :-** 08/02/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महापालिका ठराव क्रमांक ८१, दिनांक २९-०६-१९९४ नुसार एल.एस.जी.डी. परिक्षा देण्याकरिता ज्या कर्मचा-यांनी कार्यालयाची पुर्व परवानगी घेतली आणि भविष्यांत परवानगी घेतली आणि जे हि परिक्षा उत्तीर्ण होतील अशा सर्व महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनाच दोन अग्रिम वेतनवृध्दी मंजूर करण्यांत आलेली आहे.

तसेच या अनुषंगाने या कार्यालयाद्वारा शासनास मागितलेल्या मार्गदर्शनाचे अनुषंगाने उप सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक १२२२/प्र.क्र. १८१/नवि-२६ दिनांक ०१-११-२०२३ मध्ये नमुद नुसार महानगरपालिका सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांना नगरविकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व गृहनिर्माण विभाग, शासन परिपत्रक दिनांक १८-०२-१९७५ व नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १५-०५-२००८ अन्वये दिली जात असलेली आगाऊ/जादा वेतनवाढ ही महानगरपालिका अधिनियम/नियम इ. चा अभ्यास करुन चांगल्या प्रकारे महानगरपालिका सेवेची जबाबदारी पार पाडता यावी यासाठी देण्याची तरतुद आहे. प्रस्तुत परिपत्रक व शासन निर्णयान्वये देण्यांत येणारी वेतनवाढ ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २४-०६-२०१७ नुसार अतिउत्कृष्ठ काम केल्यास अनुज्ञेय असलेल्या वेतनवाढी पैकी नाहीत. सदर वेतनवाढी हया एल.एस.जी.डी. किंवा एल.जी.एस. परिक्षा उत्तीर्ण झाल्याने देण्यांत आल्याने सदर वेतनवाढीचा सहाव्या वेतन आयोगात वेतन निश्चिती करतांना लाभ देणे योग्य ठरते, त्या अनुषंगाने आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांनी त्यांच्या स्तरावर योग्य निर्णय घ्यावा असे अभिमत प्राप्त आहे.

तसेच या संबंधाने मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपिठ नागपूर येथे दाखल याचिका क्रमांक ३५७८/२०२३ चे अनुषंगाने दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजीचे आदेशान्वये शासनाने जारी केलेल्या दिनांक ०१.११.२०२३ पत्राच्या संदर्भा अन्वये, याचिकाकर्त्याच्या एल.एस.जी.डी. पास केल्याने दोन आगाऊ वेतन वृध्दी

वाढीच्या दाव्या बाबत (Entitlement) आदेश दिनांका पासून १० दिवसाचे आत महानगरपालिका नागपूर यांनी निर्णय घ्यावा असे निर्देशित आहे.

शासन निर्णय, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, निर्णय क्रमांक क्र. पीएमसी ३००६/२५२७/प्र.क्र. २६/०७/नवि २२ दिनांक १५ मे २००८ मधील तरतुदी नुसार एल.एस.जी.डी. किंवा एल.जी.एस. पदवीकांचा अभ्यासक्रम उत्तीर्ण केल्याच्या दिनांकापासून "स्थानिक स्वराज्य संस्थेतील कर्मचाऱ्यांना एक वेतनवाढ द्यावी" असे नमुद असल्याने खालील प्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेऊन,

१) एल.एस.जी.डी./एल.जी.एस. परिक्षा पुर्व परवानगी घेवून उत्तीर्ण असणाऱ्या/होणाऱ्या (यापुर्वी परिक्षा उत्तीर्ण झालेले असतील तथापी लाभ अनुज्ञेयता बाबत सक्षम प्राधिकारी मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त नसल्याने अमंल झाला नसेल अश्या प्रकरणांसह) नागपूर महानगरपालिकेत कार्यरत मनपा कर्मचारी यांना उक्त अभ्यासक्रम उत्तीर्ण केल्यामुळे ही परिक्षा उत्तीर्ण केल्याच्या दिनांकापासून नमूद सुधारीत धोरणाप्रमाणे फक्त एक आगाऊ वेतनवाढ संबंधीत अटी/ शर्तीच्या अधिन राहून देय राहील.

२) यापूर्वी एल.एस.जी.डी./एल.जी.एस. परिक्षा उत्तीर्ण केलेल्या मनपा कर्मचाऱ्यांना मनपा ठरावाचे अनुषंगाने (ठराव क्रमांक ८१, दिनांक २९-०६-१९९४) सक्षम प्राधिकारी मा. आयुक्त यांचे मान्यतेने दोन वेतनवाढी देऊन वेतन निश्चिती केलेल्या वेतनाच्या आधारे झालेल्या प्रदानातुन कोणतीही वसुली करण्यात येऊ नये.

३) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीएमसी ३००६/२५२७/प्र.क्र. २६/ ०७/नवि २२ दिनांक १५ मे २००८ मध्ये नमुद प्रमाणे, "स्थानिक स्वराज्य संस्थेतील दरवर्षी केवळ १ टक्के कर्मचा-यांना या प्रमाणे एक वेतनवाढ देय राहिल. अधिक कर्मचारी परिक्षेत बसून उत्तीर्ण झाल्याने हि वेतनवाढ सर्वात अधिक गुण मिळणा-या १ टक्के कर्मचा-यांना देय राहिल.

वरील प्रमाणे प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.